केंद्रीय मदतीत घट, राज्याच्या तिजोरीवर भार

राज्य सरकारकडून वित्त आयोगासमोर अडचणींचा पाढा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : वस्तू आणि सेवा कराची नुकसानभरपाई बंद झाल्याने तसेच विविध केंद्रीय योजनांमधील हिस्सा कमी केल्याने केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीत घट झाली. परिणामी त्याचा भार राज्याच्या तिजोरीवर आल्याची बाब महाराष्ट्र सरकारच्या वतीने १६व्या वित्त आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आली.

वस्तू आणि सेवा कराची नुकसानभरपाई बंद झाल्याने राज्यावर बोजा आला आहे. वस्तू आणि सेवा कर प्रणाली लागू झाल्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थांना दरवर्षी राज्य सरकारला निधी द्यावा लागतो.

दरवर्षी आठ टक्के वाढ गृहित धरून तेवढी रक्कम द्यावी लागते. चालू आर्थिक वर्षात पालिकांना नुकसानभरपाई म्हणून ३० हजार ८५३ कोटींची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

केंद्राकडून पाच वर्षे राज्यांना नुकसानभरपाई देण्यात येत होती. पण २०२२ पासून ही नुकसान भरपाई बंद झाल्याने राज्यावरील आर्थिक बोजा वाढल्याकडे राज्य शासनाने वित्त आयोगाचे लक्ष वेधले. केंद्राकडून मिळणारी मदतही घटली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्याने अपेक्षित धरलेल्या रकमेच्या ५५ टक्केच रक्कम केंद्राकडून मिळाल्याचा मुद्दा राज्याच्या वतीने उपस्थित करण्यात आला. गेल्या वर्षी ५७,६९२ कोटींची मदत अपेक्षित धरली असताना प्रत्यक्षात ३१८३० कोटी रुपयांची मदत मिळाली. २०१०-२० मध्ये ४३,७२५ कोटी, २०२०-२१ मध्ये ५२,७३३ कोटी, २०२१-२२ या वर्षात ३८ हजार कोटी, २०२२-२३ मध्ये ५१,४१४ कोटी, २०२३-२४ मध्ये ३६ हजार कोटी तर गेल्या वर्षी ही मदत ३१ हजार कोटींपर्यंत घटली.

आठव्या वेतन आयोगाचा फटका

केंद्र सरकारने कर्मचाऱ्यांसाठी आठवा वेतन आयोग स्थापन करण्याची घोषणा केली आहे. यानुसार राज्यातही आयोगाची स्थापना करून त्या अहवालाच्या आधारे वेतन द्यावे लागणार आहे. चालू आर्थिक वर्षात वेतन व निवृत्ती वेतनसाठी ४५ टक्के खर्च होणार आहे. आठव्या वेतन आयोगानंतर हे प्रमाण आणखी वाढणार आहे. ही शक्यता गृहित धरून केंद्राने राज्याच्या वाट्यात वाढ करावी, अशी मागणी सरकारच्या वतीने करण्यात आली.



योजनांवर सर्वाधिक खर्च

विविध केंद्र पुरस्कृत योजनांसाठी केंद्र सरकारने निधीत कपात केल्याने राज्याला अधिक निधी या योजनांसाठी खर्च करावा लागत आहे.२०१८-१९ मध्ये केंद्रपुरस्कृत योजनांवर केंद्र सरकारचा वार्षिक वाटा हा ६७ टक्के तर राज्याचा वाटा ३३ टक्के होता. २०२१-२२ मध्ये केंद्राचा वाटा ७७ टक्के तर राज्याचा वाटा २३ टक्के होता. गेल्या वर्षी हेच प्रमाण केंद्र व राज्याचे प्रत्येकी ५० टक्क्यांपर्यंत कमी झाले. सामाजिक न्याय विभागाशी संबंधित या योजना असल्याने त्यासाठी राज्याला निधी द्यावा लागतो. निधीची तरतूद करताना राज्यावर बंधने येत असल्याकडे लक्ष वेधण्यात आले.

जाचक अटींमुळे अडचणी

- केंद्राच्या जाचक अटींमुळे आर्थिक मदत मिळण्यात अडचणी येतात, अशी तक्रारही राज्याच्या वतीने करण्यात आली.
- ग्रामीण विकास, नगरविकास , मदत व पुनर्वसन तसेच सार्वजनिक आरोग्य या चार खात्यांसाठी केंद्राकडून १५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार २०२० ते २०२५ या कालावधीत ७१ हजार ५१० कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात ४६,९३९ कोटीच राज्याला प्राप्त झाले.
- केंद्राकडून २५ हजार कोटी अजून प्राप्त झालेले नाहीत.

राज्याची आर्थिक स्थिती उत्तम

वित्त आयोगाचे अध्यक्ष पानगढिया यांच्याकडून कौतुकाची थाप

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



मुंबई : वित्तीय तूट, कर्जाचा बोजा वाढल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात येत असली तरी महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती उत्तम असल्याचा निर्वाळा १६व्या वित्त आयोगाचे अध्यक्ष अरविंद पानगढिया यांनी दिला.

पानगढिया यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निधी वाटपाबाबत राज्याची भूमिका जाणून घेण्यात आली. या वेळी राज्य शासनाच्या वतीने मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले तसेच सादरीकरणही करण्यात आले. सकल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत महाराष्ट्राची वित्तीय तूट ही ३ टक्क्यांपेक्षा कमी आहे. काही अपवादात्मक परिस्थितीत अर्धा टक्का तूट वाढली तरी ती ग्राह्य मानली जाते. महाराष्ट्राची वित्तीय तूट कायम तीन टक्क्यांपेक्षा कमी राहिली आहे. कर्जाचे प्रमाणही मर्यादित आहे. सर्व आघाड्यांवर महाराष्ट्राची वित्तीय परिस्थिती चांगली असल्याचे पानगढिया यांनी सांगितले.

१ लाख २८ हजार कोटींच्या विशेष पॅकेजची मागणी

- महाराष्ट्र सरकारने १ लाख २८ हजार कोटींच्या विशेष पॅकेजची मागणी केली आहे. तसेच शहरी आणि ग्रामीण भागासाठी प्रत्येकी १० टक्क्यांची स्वतंत्रपणे मागणी केली आहे. अशी मागणी नोंदविणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याचेही पानगढिया यांनी सांगितले.

महाराष्ट्र सायबरच्या चॅटबॉट, माहितीपटाचे लोकार्पण

मुंबई : सायबर सुरक्षेसाठी देशातील अत्याधुनिक सुविधा महाराष्ट्रात असून सायबर गुन्हे, फसवणूक आणि मानवी तस्करीपासून नागरिकांना वाचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासंदर्भात पुढील काळात अधिक परिणामकारपणे काम करणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी येथे केले. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सायबर विभागाच्या आर्टिफिशियल इंटिलिजन्स बॉट व सायबर जागरुकता माहितीपट या नाविन्यपूर्ण नागरिक केंद्रीत उपक्रमाचे उद्घाटन सह्याद्री अतिथिगृहात करण्यात आले. यावेळी सायबर विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव, पोलीस उपमहानिरीक्षक संजय शिंत्रे, पोलीस अधीक्षक हेमराजसिंग राजपूत, अभिनेता शरद केळकर, अभिनेत्री अमिषा पटेल आदी उपस्थित होते. या माध्यमातून सायबर गुन्हेगारी, फसवणूक संबंधी जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी राज्य सायबर विभागाच्या कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅट बॉटचे सादरीकरण करण्यात आले. हा चॅटबॉट महाराष्ट्र सायबरच्या १९४५ या हेल्पलाईनशी जोडला गेला आहे.

नागपूर विधानभवन विस्तारीकरणाच्या वादावर तोडगा

सरकारी मुद्रणालय, शहर पुरवठा कार्यालयाची जागा निश्चित

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : नागपूरच्या विधानभवनाचा विस्तार करण्यात येणार आहे. सरकारी मुद्रणालय आणि शहर पुरवठा कार्यालयाची जागा नागपूर विधानभवनासाठी देण्यात येणार असून या दोन्ही कार्यालयांना अन्यत्र जागा देण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

नागपूर विधानभवनाचा विस्तार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासाठी हवी असलेली अतिरिक्त जागा सध्याच्या विधानभवनाच्या मागे सरकारी मुद्रणालय आणि पुरवठा विभागाची जागा घेण्याचे ठरले होते. मात्र या दोन्ही विभागांनी जागा देण्यास नकार दिला होता.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या बैठकीत या दोन्ही कार्यालयांना पर्यायी जागा शोधून प्रस्ताव सादर कराण्याचे आदेश दिले. सरकारी मुद्रणालय आणि पुरवठा विभागाला नवीन जागा उपलब्ध करून देण्यात येईल. त्यांनी पुढील दोन दिवसांत जागांचा शोध घेऊन त्याबाबत प्रस्ताव सादर करावेत. शासकीय जागा असल्या तरी या गोदामातून शहरातील लोकांना कमीत कमी वेळेत धान्य पुरवठा होईल अशा पद्धतीची जागा उपलब्ध करून देण्यात येईल. नवीन जागा पाहून त्या ठिकाणी बांधकाम करून दिल्यानंतरच संबंधित जागा ताब्यात घेण्यात येईल. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊन त्यावर शिक्कामोर्तब करण्यात येईल. शासकीय मुद्रणालयाची काही जागा शिल्लक आहे. ही जागा विधानभवनासाठी आवश्यक आहे तसेच शहर पुरवठा विभागाचे उर्वरित जागेतदेखील बांधकाम करणे आवश्यक असल्याने या दोन्ही जागा शासनास देण्यात याव्यात, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले.

निशाणा आव्हाडांवर, लक्ष्य मात्र भाजप

भाजप वाटेवरील नगरसेवकांचा शिंदे सेनेत प्रवेश

जयेश सामंत, लोकसत्ता

ठाणे : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होण्याची चिन्हे दिसत आहेत. असे असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी भाजपच्या वाटेने निघालेल्या शरद पवार यांच्या पक्षाच्या सात नगरसेवकांना शेवटच्या क्षणी आपल्या पक्षात ओढून घेतल्याने या राजकीय नाट्याची आणि भाजपशी असलेल्या सुप्त संघर्षाची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली.

आमदार जितेंद्र आव्हाड यांचे कट्टर समर्थक असलेले हे नगरसेवक तीन महिन्यांपासून भाजपच्या संपर्कात होते. महापालिका निवडणुका जाहीर होताच या नगरसेवकांना पक्षात घ्यायचे, अशी रणनीती भाजपकडून आखली गेली होती. मात्र शिंदे यांनी हा डाव उलटून लावला.

ठाणे, नवी मुंबई, अंबरनाथ बदलापूर, कल्याण, डोंबिवली या सारख्या शहरांमध्ये शिंदे सेना आणि भाजपमध्ये वरच्या वर संघर्ष होताना पाहायला मिळतो. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्रीपद येताच जिल्ह्यातील भाजप नेते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. वनमंत्री गणेश नाईक, आमदार किसन कथोरे यांनी वेळोवेळी शिंदेसेनेसोबत संघर्ष पुकारल्याचे पाहायला मिळते. ठाण्यात यापुढे फक्त कमळ अशी घोषणा करत गणेश नाईक यांनी शिंदे यांच्या बालेकिल्ल्यातच त्यांना आव्हान दिले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या वाटेने निघालेल्या कळव्यातील सात नगरसेवकांना ऐनवेळी आपल्या पक्षात घेत शिंदे यांनी भाजपला धोबीपछाड दिले.

अजित दादा- भाजपला हुलकावणी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या संपर्कात हे नगरसेवक असल्याची चर्चा होती. कल्याण लोकसभेच्या राजकारणात रवींद्र चव्हाण आणि श्रीकांत शिंदे यांच्यात विस्तवही जात नाही. चव्हाण यांची खेळी अंतिम टप्प्यात जात आहे हे लक्षात येताच दोन दिवसांपूर्वी वेगाने पावले उचलत आव्हाड समर्थक सात माजी नगरसेवकांना आपल्या पक्षात घेत, शिंदे पिता-पुत्रांनी भाजपला तर धक्का दिलाच शिवाय हा मतदारसंघ बांधण्यासाठी हालचाली करणाऱ्या अजित पवार गटालाही वेसण घातल्याचे पाहायला मिळत आहे.

इतके दिवस जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वात काम केले. आव्हाड यांना विकासाची दृष्टी होती. मात्र एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून नव्या कळव्याची पाया भरणी केली जात आहे. कळव्याच्या विकासासाठी आम्ही शिवसेनेत प्रवेश केला आहे.

- मिलिंद पाटील, माजी नगरसेवक, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष

MAHARASHTRA AIRPORT DEVELOPMENT CO. LTD
MADC
Central Facility Building, 1st Floor, MIHAN SEZ,
Khapri (Rly.), Nagpur – 441108 Tel. No. (0712) 2815637

SHORT E -TENDER NOTICE

Consultancy Services for Construction of Link Taxiway (Approx. Length 1400m) from Existing MIHAN Taxiway up to 3 lane road at Sector-10 within processing SEZ of MIHAN notified area Nagpur And (Approx. Length 550m) from Existing MIHAN Taxiway up to Relocated IAF Land for Aircraft Operation in MIHAN Nagpur.(2nd call)

Estimated Cost Rs. 1/-

Note: - For more details visit website www.mahatenders.gov.in or contact our office at Nagpur.

Office In-charge
MADC Ltd., Nagpur

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), व्ही.आय.पी. रोड, धरमपेठ, नागपूर ४४० ०१०

ई-निविदा सूचना

रामेती खोपोली संस्थेच्या Electrical Installation for proposed Hostel at RAMETI Khopoli ही निविदा दिनांक ०९.०५.२०२५ ते दि. १९.०५.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक
वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई–मेल: ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या तिमाही व वार्षिक लेखापरीक्षित आर्थिक परिणामांचे सार

(₹ लाखांमध्ये; प्रत्येक समभागाच्या माहिती व्यतिरिक्त)

तपशील	संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ डिसेंबर, २०२४ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३१ मार्च, २०२४ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२५ लेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च, २०२४ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	६,००७	६,०९७	४,३६०	२३,८९७	१६,७३६
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींपूर्वी)	३,२८१	३,७५९	२,४२८	१४,३३६	३,२८२
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	३,२८१	३,७५९	२,४२८	१४,३३६	३,२८२
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	३,२९२	३,७३९	२,४०५	१४,३२७	३,२५९
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	३,२९०	३,७०९	२,४०५	१४,२९७	३,२४२
६. समभाग भांडवल (₹१०/– प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	(३,९८६)	(१६,८६८)
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/– प्रत्येकी)* मूलभूत आणि सौमिकृत (₹)	१.३७	१.५६	१.००	५.९७	१.३६

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

नोंद:
१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून दिनांक ०७ मे २०२५ रोजी केले गेले आहे आणि दिनांक ०८ मे २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत त्यांना मान्यता मिळाली आहे.

स्थळ: मुंबई
दिनांक: ०८ मे २०२५

संपूर्ण वित्तीय निष्कर्ष पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा
किंवा: https://www.mcxccl.com/disclosures/financial-results ला भेट द्या.

मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/–
नरेंद्र कुमार अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ट्रेडमार्क

खबरदारी नोटीस

आमचे अशील, कूपर कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड, ही भारतीय कंपनी कायद्यांतर्गत समाविष्ट केलेली कंपनी आहे, आणि त्यांचे व्यवसायाचे ठिकाण ' नरिमन हाऊस', एम 60-1, अतिरिक्त MIDC क्षेत्र सातारा – 415004 महाराष्ट्र, भारत इथे असून आपली कॉर्पोरेट ओळख आणि व्यवसाय कार्य यांचा भाग म्हणून हाऊस मार्क 'कूपर' याचा सर्वस्वी वापर करत आहेत. आमचे अशील ट्रेडमार्क 'कूपर ' (शब्द चिन्ह) यांचे वैधानिक मालक आहेत जो 01/01/1940 पासून नोंदणी क्रमांक 2738753 अंतर्गत वर्ग 7 मध्ये **नोंदणीकृत** आहे. आमच्या अशीलांकडे कूपर फॉर्मेटिव्ह मार्कसाठी अनेक नोंदणी आहेत. शिवाय, आमचे अशील युनायटेड किंग्डम युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका आणि युरोपियन युनियन यासारख्या जगभरातील अनेक अधिकारक्षेत्रांमध्ये **'कूपर'** ट्रेडमार्कचे वैधानिक मालक देखील आहेत. शिवाय, भारतीय ट्रेडमार्क रजिस्ट्रीने आमच्या अशिलांचा ट्रेडमार्क **'कूपर'** हा एक **सुप्रसिद्ध ट्रेडमार्क** म्हणून निश्चित केला आहे.

COOPER®

वरील नोंदणीमुळे, आमच्या अशिलाला वर उल्लेख केलेल्या ट्रेडमार्क किंवा त्याच्याशी फसव्या पद्धतीने जुळणाऱ्या इतर कोणत्याही ट्रेडमार्कचा विशेष वापर करण्याचे सामान्य कायदेशीर आणि वैधानिक अधिकार आहेत. परिणामी, इतर कोणत्या. ही संस्थेला वरील कोणत्याही वस्तू / सेवांवर किंवा त्यांच्याशी संबंधित ट्रेडमार्क किंवा गोंधळात टाकणारे किंवा फसव्या पद्धतीने जुळणारे इतर कोणतेही ट्रेडमार्क ट्रेडमार्क आणि / किंवा ट्रेड नाव म्हणून वापरणे कायदेशीर असणार नाही.

व्यापारातील सदस्यांना आणि जनतेला याद्वारे सावध केले जाते आणि सूचित केले जाते की आमच्या अशिलाचा कोणताही संबंध किंवा संलग्नता नसलेले कोणतेही बेईमान उत्पादक, वितरक आणि व्यापारी त्यांच्या वस्तू / सेवा उपरोक्त ट्रेडमार्क अंतर्गत किंवा आमच्या अशिलाच्या नोंदणीकृत ट्रेडमार्कशी फसव्या पद्धतीने जुळणाऱ्या इतर कोणत्याही चिन्हाखाली चुकीच्या पद्धतीने सादर करू शकतात किंवा प्रसारित करू शकतात किंवा आमच्या अशिलाच्या वस्तू / सेवांवर किंवा त्यांच्या संबंधात वस्तू किंवा सेवांसाठी त्यांच्या व्यापार शैलीचा भाग म्हणून कूपर हे नाव वापरू शकतात.

आर. के. दिवाण अँड कंपनी,
ट्रेड मार्क्स अँड पेटंट अॅटर्नीज
5वा मजला, पोदार चेंबर्स,
एस. ए. ब्रेल्वी रोड, फोर्ट,
मुंबई – 400001.

आज 9 मे 2025 रोजी
कूपर कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडसाठी

सिडको शहरांचे शिल्पकार

शुद्धिपत्रक

नवी मुंबईच्या विविध नोडमधील भूखंड खाजगी सुपरस्पेशालिटी रुग्णालयाकरिता (आरोग्य सुविधा) भाडेपट्ट्यावर उपलब्ध

योजना क्र. : सासे/एचओएसपी/०१/२०२५–२६

सिडको महामंडळातर्फे **नवी मुंबईच्या विविध नोडमधील भूखंड खाजगी सुपरस्पेशालिटी रुग्णालयाकरिता (आरोग्य सुविधा) भाडेपट्ट्यावर उपलब्ध** करून देण्याकरिता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरात मंगळवार, दि. ०८ एप्रिल २०२४ रोजी दैनिक लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस आणि नवभारत मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती.

अर्ज प्रक्रियेच्या वेळापत्रकात सुधारणा करण्यात आली असून https://eauction.cidcoindia.com या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करता येणार आहेत, याची कृपया सर्व इच्छुक अर्जदार/निविदाकारांतर्फे नोंद घेण्यात यावी.

अर्ज प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक पुढील प्रमाणे :

१) ऑनलाइन अर्ज नोंदणीकरिता शुल्क भरणा दि. १७.०४.२०२५ रोजी ११.०० वाजेपासून ते दि. १६.०५.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत करता येईल.
२) अर्ज सादर करणे व प्रक्रिया शुल्क भरणा दि. १७.०४.२०२५ रोजी ११.०० वाजेपासून ते दि. १६.०५.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत करता येईल.
३) अनामत रकमेचा भरणा दि. १७.०४.२०२५ रोजी ११.०० वाजेपासून ते दि. १९.०५.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत करता येईल.
४) कागदपत्रे दि. १७.०४.२०२५ रोजी ११.०० वाजेपासून ते दि. २०.०५.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सादर करता येतील.
५) निविदांची तांत्रिक छाननी दि. २१.०५.२०२५ ते दि. २७.०५.२०२५ या कालावधीत करण्यात येईल.
६) बंद निविदा दि. २८.०५.२०२५ रोजी ११.०० वाजेपासून ते दि. २८.०५.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत सादर करता येतील.
७) ऑनलाइन ई–लिलाव दि. २९.०५.२०२५ रोजी ११.०० वाजेपासून ते दि. २९.०५.२०२५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत करण्यात येईल.
८) निकाल दि. ३०.०५.२०२५ रोजी १५.०० वाजता घोषित करण्यात येईल.

योजनेतील कोणताही भूखंड रद्द करण्याचे किंवा निविदा योजनेतील अटींमध्ये बदल करण्याचे किंवा कोणताही/सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार सर्वस्वी सिडको महामंडळाकडे राखीव आहेत.

महाव्यवस्थापक
(सामाजिक सेवा)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/कमसंपर्क/०१३(अ)/२०२५-२६

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय:
बृंदावन, प्लॉट नं. १७७, कलिना,
सीएसटी रोड, मॉर्डिडीज शोरूम जवळ,
सांताक्रूझ (पू), मुंबई ४०० ०९८
CIN No.: L67120MH2008PLC181833

T +९१ २२ ६२१२ ५०००
F +९१ २२ ६२१२ ५५५३
E igrc@ltfs.com
www.ltfinance.com

L&T Finance

सतराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

ह्याद्वारे **सूचना** दिली जात आहे की कंपनीची **सतरावी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') मंगळवार, ३ जून २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता (भारतीय प्रमाणवेळ) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून [व्हिडिओ कॉन्फरंस (''व्हीसी'') किंवा इतर ऑडिओ–विजूअल माध्यमातून (''ओएव्हीएम'')]** एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये (''सूचना'') नेमून दिलेले कामकाज पार पाडण्यासाठी भरवण्यात येईल. कॉर्पोरेट मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकांनुसार (ताजे परिपत्रक १९ सप्टेंबर २०२४) (''एमसीए परिपत्रके'') ही एजीएम इलेक्ट्रॉनिक माध्यमातून भरवण्यात येईल.

एमसीए परिपत्रके, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') द्वारे जारी केलेले परिपत्रके, कंपनी कायदा, २०१३ ('अधिनियम') आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स') च्या संबंधित तरतुदींचे पालन करून, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५ साठी एकात्मिक वार्षिक अहवाल ('अहवाल') फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने अशा सदस्यांना पाठवला जात आहे ज्यांचे ई–मेल पत्ते डिपॉझिटरी पार्टिसिपंट ('डीपी')/कंपनी/रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट्स उदा. एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (आधीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) ('आरटीए') यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. ई–मेल पत्ता डीपी/कंपनी/आरटीएकडे नोंदणीकृत नसेल तर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सूचना आणि अहवाल प्राप्त करण्याच्या मर्यादित उद्देशासाठी, सदस्य igrc@ltfs.com वर कंपनीला ई–मेल पाठवून ई–मेल आयडी नोंदणीकृत करू शकतात.

ज्या सदस्यांनी अद्याप त्यांचे ई–मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांना विनंती आहे की जर समभाग डीमटेरियलाइज्ड स्वरूपात असतील तर त्यांनी त्यांच्या डीपीकडे आणि जर समभाग भौतिक स्वरूपात असतील तर कंपनी/आरटीएकडे ते नोंदणीकृत करावेत.

ही सूचना आणि अहवाल कंपनीच्या https://www.ltfinance.com/investors या वेबसाइटवर, स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com वर देखील उपलब्ध असतील. ही सूचना सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ('सीडीएसएल') च्या www.evotingindia.com या वेबसाइटवर देखील उपलब्ध असेल.

सदस्य फक्त व्हीसी/ओएव्हीएम द्वारेच वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत सामील होण्याची प्रक्रिया आणि माहिती सूचनेत नमूद केली आहे.

सर्व सदस्यांसाठी (भौतिक स्वरूपात समभाग धारण करणारे/ज्यांचे ई–मेल पत्ते डीपी/कंपनी/आरटीएकडे नोंदणीकृत नाहीत अशा सदस्यांसह) वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सविस्तर प्रक्रिया आणि माहिती सूचनेत नमूद केली आहे.

२५ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत प्रति समभाग २.७५ रुपये अंतिम लाभांश देण्याची शिफारस करण्यात आली आहे. अंतिम लाभांश देण्यासाठी रेकॉर्ड तारीख मंगळवार, २७ मे २०२५ आहे. जर अंतिम लाभांश, सदस्यांनी निश्चित वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर केला तर, ३ जुलै २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने विविध ऑनलाइन हस्तांतरण पद्धतींद्वारे ज्या सदस्यांनी त्यांचे बँक खाते तपशील अद्यतनित केले आहेत, त्यांना दिला जाईल. ज्या सदस्यांनी त्यांच्या बँक खात्याची माहिती अपडेट केलेली नाही त्यांच्या बाबतीत, लाभांश वॉरंट/डिमांड ड्राफ्ट/चेक त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठवले जातील. लाभांश मिळण्यास विलंब होऊ नये म्हणून, सदस्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या डीपी (जिथे समभाग डीमटेरियलाइज्ड स्वरूपात ठेवलेले असतात) आणि आरटीए (जिथे समभाग भौतिक स्वरूपात ठेवलेले असतात) सोबत त्यांचे इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टम (ईसीएस) मॅन्डेट अपडेट करावे जेणेकरून लाभांश वाटपाच्या तारखेला त्यांच्या बँक खात्यात थेट लाभांश मिळेल.

सदस्यांनी हे लक्षात ठेवावे की वित्त कायदा, २०२० च्या तरतुदींनुसार, भागधारकांच्या हातात लाभांश उत्पन्न करपात्र आहे आणि कंपनीला विहित दराने भागधारकांना दिलेल्या लाभांशातून कर वजा करणे आवश्यक आहे. घोषित लाभांशावरील कर वजावटीच्या संदर्भात आवश्यक माहिती (कंपनीला सादर करावयाच्या तपशीलांसह) सदस्यांच्या संदर्भासाठी सूचनेमध्ये नमूद केली आहे.

एल&टी फायनान्स लिमिटेडसाठी
(आधीचे नाव एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)

अपूर्वा राठोड
कंपनी सचिव
एसीएस १८३१४

स्थळ: मुंबई
दिनांक: ८ मे २०२५